
ओळख
थोर नेत्यांची
संभाजी पाटील,
लीला पाटील
परी
प्रकाशन

ओळख थोर नेत्यांची

© सुरक्षित

प्रकाशक :
परी प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

प्रमुख वितरक
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

मुखपृष्ठ :
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

मुद्रक :
जयंत प्रिंटरी

आवृत्ती :
२९ ऑगस्ट, २०१३

किंमत :
रुपये १३०/-

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | थोर सेनानी – तात्या टोपे | ३ |
| २. | थोर समाजसुधारक – गोपाळ गणेश आगरकर | २० |
| ३. | क्रांतिकारकांचे वस्ताद – लहुजी साळवे | ३८ |
| ४. | लोकनायक – जयप्रकाश नारायण | ५५ |
| ५. | प्रतिभाशाली नेते – स्वातंत्र्यवीर सावकर | ७२ |
| ६. | पोलादी पुरुष – सरदार पटेल | ९० |
| ७. | आचार्य विनोबा भावे | १०८ |
| ८. | राष्ट्रपिता महात्मा गांधी | १२५ |
| ९. | स्वातंत्र्य युद्धातील महानायक –नेताजी सुभाषचंद्र बोस | १४२ |
| १०. | भारतीय असंतोषाचे जनक –लोकमान्य टिळक | १६० |

## थोर सेनानी

# तात्या टोपे



इंग्रज भारतात व्यापारासाठी आले होते. भारतात आल्यावर त्यांनी अनेक ठिकाणी आपल्या वखारी उभारल्या होत्या. या वखारींच्या माध्यमातून त्यांनी आपल्या व्यापाराचे जाळे सर्व भारतभर पसरले होते. भारतातील महत्त्वाची शहरे, महत्त्वाचे राज्यकर्ते यांची त्यांना इत्यंभूत माहिती होती. खेडीपाडी त्यांनी पालथी घातली होती. खेड्यांतील छोटे व्यवसाय, कुटिरोद्योग याबद्दल सविस्तर माहिती होती.

भारतीय राज्यकर्त्यांमधील आपापसातील झुंज, हेवेदावे याचाही ब्रिटिशांना अभ्यास होता. या सर्व परिस्थितीचे अवलोकन करून इंग्रज भारतभूवर आपले पाय घट्ट रोवण्याचे इरादे करू लागले. भारतातील अज्ञानाचाही त्यांनी फायदा उठवला. प्रत्येक राज्यकर्त्यांकडे ईस्ट इंडिया कंपनीने आपले वकील पाठवून आपले बस्तान बसवले.

पुढे काट्याने काटा काढत इंग्रजांनी आपले बस्तान बसवण्यास सुरुवात केली होती. इंग्रजांना मराठे ओळखून होते. मोगली साम्राज्याच्या ऱ्हासानंतर मराठ्यांचीच सत्ता संपूर्ण भारतभर पसरली होती. प्रचंड वेगाने वाढलेली मराठ्यांची सत्ता कुशल नेतृत्त्वाच्या अभावामुळे तितक्याच जलद गतीने ढासळली. अंतर्गत बंडाळी, एकीचा अभाव यामुळे मराठी सत्ता उद्ध्वस्त झाली.

१९ व्या शतकाचा सूर्य उगवला आणि मराठी सत्तेचा अस्त जवळ दिसू लागला. पेशव्यांच्या नाकर्तेपणामुळे आणि मराठी सरदारांतील असलेल्या बेकीमुळे इंग्रजांना मराठी सत्ता उद्ध्वस्त करायला वेळ लागला नाही. पेशव्यांनीच आपल्या सरदाराचा काटा काढण्यासाठी आणि आपले पेशवेपद टिकवण्यासाठी इंग्रजांचे सहाय्य घेतले होते. धूर्त इंग्रजांना हेच हवे होते. त्यांच्या धूर्त राजनीतीला भारतातील अनेक सत्ता बळी पडल्या होत्या.

१० मे १८१८ हा दिवस मराठ्यांच्या इतिहासातील 'काळा' दिवस ठरला. याच दिवशी महाराष्ट्रात इंग्रजी सत्तेचा सूर्य उगवला आणि मराठी सत्तेचा अस्त झाला. पुण्याच्या शनिवार–वाड्याच्या तटावर डौलाने फडकत असलेला भगवा खाली उतरला गेला. त्याच ठिकाणी

इंग्रजांचा ध्वज फडकू लागला. क्रूर इंग्रजी सत्ता महाराष्ट्रात मग्रूरतेने वागू लागली. स्वाभिमानी मराठी जनतेच्या तळपायाची आग मस्तकाला जाऊ लागली. महाराष्ट्रात फडकत असलेला इंग्रजी सत्तेचा ध्वज मराठ्यांना सलत होता. त्यातूनच क्रांतिकारक, देशभक्त निर्माण होत होते.

जेव्हा इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाली तेव्हापासूनच या सत्तेला हादरे देणारे अनेक देशभक्त निर्माण झाले. इंग्रजांनी कित्येकांना फासावर चढवले, कित्येकांना पायदळी तुडवले, तर कित्येकांना गोळ्या घातल्या; परंतु नव्या जोमाने नवे क्रांतिकारक भारतभूमीच्या मुक्तीसाठी आत्मबलिदान देण्यास पुढे आले. त्यांनी कोणत्याही प्रकारची तमा न बाळगता स्वातंत्र्याच्या अग्निकुंडात उड्या घेतल्या होत्या.

१० मे हाच दिवस क्रांतिकारकांच्या असंतोषाचा ज्वालामुखी होण्याचा दिवस ठरला. १८५७ साली मिरतच्या उठावात हा स्फोट झाला. येथूनच स्वातंत्र्ययुद्धाची खरी ठिणगी पडली. या स्वातंत्र्ययुद्धाचे पहिले सेनापती म्हणून तात्या टोपे यांचे नाव अग्रक्रमाने झळकत राहिले. याच तात्या टोपे यांच्या कार्याचा परिचय या पुस्तकाच्या रूपाने करून द्यावयाचा आहे.

✦

तात्या टोपे हे बाजीराव पेशवे यांचे निष्ठावंत सेवक होते. इंग्रज भारतात येऊन जी अत्याचार करतात, जुलमी कारभार करतात त्याचा तात्या टोपे यांना खूप राग येत असे. त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला जात असे. एकेक जुलमी अधिकाऱ्याला ठेचून काढावे असे त्यांना वाटत होते. पेशवाईवर इंग्रजांचा अंकुश वाढत गेला तशी तात्या टोपे यांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्यातूनच क्रांतियुद्धाचा भडका उडाला.

अगदी लहानपणापासूनच जुलमी आणि क्रूर इंग्रजांविरुद्ध मनिकर्णिका उर्फ मनुबाई म्हणजे झाशीची राणी लक्ष्मीबाई हिच्या मनात तीव्र नफरत निर्माण करण्यात तात्या टोपेंचा सिंहाचा वाटा होता. मनुबाई तात्या टोपेंना गुरू माने. राणी लक्ष्मीबाईच्या प्रत्येक संकटाला पहाडासारखा तात्या टोपे उभा राहिला. त्यांनी क्रांतिकारकांची फौज निर्माण केली. क्रांतिकारकांना प्रशिक्षण दिले. म्हणूनच त्यांची 'क्रांतिगुरू' अशीही ओळख आहे.

अशा या मुत्सद्दी, कर्तबगार, स्वातंत्र्यप्रेमी आणि स्वामीनिष्ठ स्वातंत्र्य सेनानीचा जन्म १८१४ साली झाला. जीवनाच्या अखेरपर्यंत इंग्रजांशी टक्कर देणाऱ्या या झुंजार सेनानीचा जन्म नेमका कुठे झाला याबाबत मतभिन्नता असली तरी त्यांचे मूळ घराणे पतोडा जिल्ह्यातील जोल परगणा येथील आहे. पांडुरंग टोपे हे देशस्थ ब्राह्मण होते. त्यांना आठ मुले होती. त्यापैकी दुसरा मुलगा म्हणजे तात्या. तात्यांचे रघुनाथ असेही नाव होते. हे रघुनाथ पांडुरंग टोपे पुढे तात्या टोपे या नावानेच प्रसिद्ध झाले.

तात्या टोपे यांचे वडील पांडुरंग टोपे हे पेशव्यांचे निष्ठावंत सेवक होते. ते दुसरा बाजीराव यांच्या ब्रह्मावर्त येथील परिवारात धर्मादाय विभागात नोकरीला होते. ब्रह्मावर्त येथेच तात्या

लहानाचे मोठे झाले. दुसरा बाजीराव यांचा दत्तक पुत्र नानासाहेब आणि मोरोपंत यांची कन्या मनुबाई यांच्यासमवेत तात्यांनी युद्धकला, लष्करी शिक्षण आत्मसात केले. मनुबाईनेही तात्या आणि नानासाहेब यांच्या समवेत चांगलीच युद्धकला आत्मसात केली होती. हीच मनुबाई पुढे झाशीची राणी लक्ष्मीबाई झाली. आपल्या वडिलांप्रमाणेच तात्याही दुसरा बाजीराव पेशवा यांच्याकडे नोकरी करू लागला.

तात्या टोपेने त्यावेळी सुरुवातीला काही दिवस ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्यात नोकरी केली. सैन्यात दिली जाणारी वागणूक ते पाहत होते. सैनिकांना विचारांचे स्वातंत्र्य नव्हते. आफ्रिकेतील गुलामांप्रमाणेच त्यांना वागणूक दिली जात असे.

सुरुवातीला तात्यांनी जरी ईस्ट इंडिया कंपतीत नोकरी पत्करली असली तरी तेथे त्यांचा जीव गुदमरत होता. अगदी तरुण वयातही स्वातंत्र्यवादी विचारांची ठिणगी त्यांच्या मनात पडली होती. इंग्रजांना धडा शिकविण्यासाठी सर्व भारतीयांनी एक झाले पाहिजे याची जाणीव त्यांना झाली होती. लवकरच तात्यांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकरीवर पाणी सोडले.

तात्यांचे वडील ब्रह्मावर्तमध्ये नोकरीला होते. तेथे त्यांनी धर्मादाय आणि गृह खाते सांभाळले होते. तात्यांनी वडिलांच्या मार्गानेच जायचे ठरवले. ते नानासाहेब पेशव्यांकडे दरबारात नोकरी करू लागले. तात्यांचा स्वभाव खूप प्रामाणिक होता. या गुणामुळेच दुसरा बाजीराव पेशवा आणि नानासाहेब यांचा विश्वास संपादन झाल्यामुळे दरबारात त्यांना सन्मानाची वागणूक मिळू लागली.

अचाट बुद्धिकौशल्याने तात्या लवकरच दरबारात लोकप्रिय झाले. त्यांना मान मिळू लागला. त्यामुळे नानांच्या प्रमुख लेखनिकपदी ते काम करू लागले. नानाचा बाणा हा लष्करी होता. त्यांना लष्करात काम करण्याची आवड होती. त्यामुळे तिकडे त्यांचा ओढा वाढू लागला.

झाशीची राणी लक्ष्मीबाईने तात्याच्या मदतीने ईस्ट इंडिया कंपनीचा जुलमी इंग्रज अधिकारी मार्शल याला वेळोवेळी धडा शिकवण्याचे काम केले होते. त्याच्या क्रूरपणाला चाप लावण्याचे काम चालू होते; पण तो उर्मट मार्शल आपल्या वागण्यात बदल करेना. त्याची अरेरावी वाढू लागली. अखेर झाशीची राणी, तात्या टोपे, समरसिंग यांनी क्रांतिगुरूच्या वेशात मार्शलवर हल्ला केला आणि त्याचा बळी घेतला. दिवसाढवळ्या मार्शलवर हल्ला करून अत्याचारी, क्रूर मार्शलचा शेवट केला होता. या सर्व घडामोडीत झाशीची राणी आघाडीवर होती. सोबत तात्या होताच.

✦

तात्या टोपे हा मुत्सद्दी सेनानी होता. धूर्त राजकारणी होता. अतिशय धुरंदर अशा तात्यांनी आपल्या प्रामाणिक वृत्तीने नानासाहेबांचा विश्वास संपादन केला होता. १८५७ ची क्रांती टप्प्यात येऊ लागली तशी तात्यांची जबाबदारी वाढू लागली. नानासाहेबांचे प्रमुख सल्लागार म्हणून तात्या काम पाहू लागले.

तात्या अतिशय बुद्धिमान सेनानी होता. त्याला इंग्रजी भाषा कळत होती. मराठी, उर्दू आणि गुजराथी भाषेवर त्याचे विशेष प्रभुत्व होते. अतुलनीय असे त्याचे संभाषण कौशल्य होते. मराठी, उर्दू आणि गुजराथी भाषेत तो उत्तम रितीने संभाषण करी. तात्या कोणतेही कार्य स्वत:च्या जिवावर उदार होऊन करत होता. त्याच्या या धाडसी वृत्तीमुळेच १८५७ च्या उठावात नानासाहेबांनी त्याला सेनापतीपद दिले होते.

सद्‌गुणी माणसाची पेशव्यांच्या दरबारात कदर केली जायची. तात्यांची समयसूचकता, धाडसी वृत्ती, करारीपणा, मुत्सद्दीपणा, परखड विचारसरणी, इंग्रजांबद्दल तीव्र द्वेष, कुशाग्र बुद्धिमत्ता, अमोघ वक्तृत्व, माणसांची मने जिंकण्याची कला इत्यादी गुणांची कदर 'दुसरा बाजीराव पेशवा' याने केली होती. म्हणूनच तात्यावर खूश होऊन भरजरी टोपी बक्षीस म्हणून त्याला दिली होती.

तात्यांचे या भरजरी रत्नजडित टोपीने जीवनच बदलून गेले. तात्या येवलेकर हे नाव मागे पडले आणि खुद्द बाजीराव पेशवेच त्यांना तात्या टोपे म्हणू लागले. तेव्हापासून तात्या येवलेकरचे रूपांतर 'तात्या टोपे' या नावात झाले. तेव्हापासून लोकही त्यांना तात्या टोपे या नावानेच ओळखू लागले.

माणसाच्या अंगातील सुप्त शक्तींना वाव मिळायला हवा त्याप्रमाणे दुसरा बाजीराव पेशवा यांच्या मृत्यूमुळे नानासाहेब यांच्याकडे पेशवेपदाची सूत्रे आली. नानासाहेबांनी तात्यांना पुरेपूर संधी दिली. २५ जुलै १८५७ रोजी तात्यांनी नानासाहेबांच्या आज्ञेवरून सेनापतीपद स्वीकारले.

१८५७ च्या उठावाच्या दरम्यानच तात्यांकडे सेनापतीपद आल्यामुळे त्यांच्यावर मोठी जबाबदारी पडली. त्यांच्या सेनापतीपदाचा कस होता. त्यांना संघटन कौशल्य पणाला लावायचे होते. जबरदस्त संघटन कौशल्याच्या जिवावर तात्यांना आपल्या सैन्य दलाची स्थिती मजबूत करावयाची होती. सेनापतीपदाची धुरा सांभाळल्यानंतर तात्यांनी हळूहळू आपले सैन्य वाढवण्याचे काम सुरू केले.

नानासाहेब पेशवे यांची अवस्था खूपच वाईट झाली होती. ते वनवासी झाले होते. फारच थोडे सैन्य शिल्लक राहिले होते. इंग्रजांनी चारी बाजूंनी त्यांना गोचीत पकडून त्यांना आर्थिक संकटात पाडले होते. सर्व जबाबदारी तात्यांवर पडली होती. सैन्य सांभाळणे, त्यांचा पगार देणे या बाबी तात्यांनाच कराव्या लागत होत्या. जिवाचे रान करून तात्या सैन्यदल सांभाळीत होते.

अपुऱ्या सैन्यानिशी आणि अपुऱ्या शस्त्रसाठ्यानिशी इंग्रजांशी टक्कर देणे अशक्य होते. प्रत्येक वेळी गनिमी कावा उपयोगी पडणार नव्हता. त्यामुळे तात्यांनी नवीन सैन्यभरती करण्यास सुरुवात केली होती. त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था केली होती. शस्त्रास्त्रे, दारूगोळा यांचीही व्यवस्था करून भक्कमपणे इंग्रजांशी दोन हात करण्यास तात्या सज्ज झाले होते.

तात्यांचे व्यक्तिमत्त्व महत्त्वाकांक्षी होते. बाजीरावांनी दिलेली जरीची टोपी ते नेहमी सैन्यासमोर घालायचे. त्या टोपीत त्यांचे व्यक्तिमत्व अधिकच खुलायचे. भरदार छाती, उमदे रूप, वळणदार मिशा आणि कोरीव भुवया यामुळे तात्यांची समोरच्या व्यक्तीवर अधिकच छाप पडायची. त्यांच्या सतेज काळ्याभोर डोळ्यात दरारा असायचा. लोकांना आपलेसे करण्याची कला त्यांच्याकडे होती. हे सारे गुण तात्यांकडे एकत्रितपणे एकवटलेले असल्यामुळे ते सेनापतीपदाची धुरा यशस्वीपणे हाताळत होते.

इंग्रजांना खरी भीती होती ती तात्यांची. ब्रह्मावर्त परिसरात तात्या आणि झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचा दबदबा होता. इंग्रजांच्या जाचातून मुक्ती तात्या आणि झाशीची राणीच करू शकतील असा लोकांचा विश्वास होता.

१८५७ च्या उठावाच्या ज्वाला सर्वत्र भडकत होत्या. सारा देश पेटून उठला होता. इंग्रजांविरुद्ध त्वेषाने झुंजत होता. उठावाला जोर लागला होता; पण सुसूत्रता नसल्यामुळे त्यांना यश येत नव्हते.

✦

१८५७ चे युद्ध हे स्वातंत्र्ययुद्ध होते. या युद्धाची लाट कानपूर आणि ब्रह्मावर्तपर्यंत पोहोचली होती. त्या काळी काही महत्त्वाची व्यापारी केंद्र होती. त्यातील कानपूर हे गंगातीरी असलेले महत्त्वाचे व्यापारी केंद्र. त्यामुळे कानपुरावर इंग्रजांचे विशेष लक्ष होते. येथेच इंग्रजांचे सैनिक ठाणे होते. ब्रह्मावर्त आणि दिल्लीच्या दरम्यान इंग्रजांची वसाहत होती. ही वसाहत म्हणजे इंग्रजांच्या हालचालीचे केंद्र होते. इंग्रजांच्या या वसाहतीत भरपूर खजिना होता. दारूगोळ्याचा साठा होता. लष्करी साहित्य होते.

सर ह्यू व्हीलर हे कानपूर-ब्रह्मावर्त परिसरातील सेनापती होते. त्यांना क्रांतिकारकांच्या भडक्याची चिंता वाटत होती. कानपूरचे शिपाई बंडाच्या पवित्र्यात होते हे ते ओळखून होते. हीच स्थिती अयोध्येची होती. तेथेही परिस्थिती हाताबाहेर जात होती. त्यामुळे सर ह्यू व्हीलर यांची चिंता वाढतच होती. अशा बिकट प्रसंगी त्यांना नानासाहेब पेशवे जवळचे वाटू लागले. त्यांची मदत घेण्याचा ते विचार करू लागले.

बाजीराव पेशव्यांच्या मृत्यूमुळे सर्व जबाबदारी नानासाहेब यांच्यावर येऊन पडली होती. त्यांना इंग्रजांनी लादलेले निर्बंध नको होते. बाजीरावाच्या मृत्यूनंतर पेन्शन आपणास मिळावी म्हणून नानासाहेबांनी इंग्रजांकडे अर्ज केला होता. तो अर्ज इंग्रजांनी धुडकावून लावला होता. त्याचा राग नानासाहेबांच्या मनात होता. तरीही नानासाहेबांनी इंग्रजांशी सबुरीचे धोरण अवलंबण्याचे ठरवले होते.

नानासाहेब बोलणीस अनुकूल आहेत हे सर ह्यू व्हीलरला कळल्यावर त्याने बोलणीच्या दृष्टीने पावले उचलली. त्याने हिलर्स्टनला नानांकडे बोलणीसाठी पाठवले. बोलणीनुसार

नानासाहेब व तात्या यांनी कानपूरला जायचे ठरवले व त्यांच्या सैनिकांचा पगार इंग्रजांनी द्यायचा असेही ठरले.

बोलणीत ठरल्याप्रमाणे तात्या आपल्या निवडक दीडशे सैनिकांसह कानपूरला निघाले. तात्यांच्या मनात काही योजना होत्या. त्याप्रमाणे सारे घडत होते.

तात्या कानपूरला जाऊन राहू लागले. तेथील परिस्थिती काही दिवसातच त्यांनी आपलीशी केली. इंग्रज सैनिकांची मने जिंकली. त्यांना तात्यांचा आधार वाटू लागला. थोड्याच दिवसात इंग्रज सैनिकांनी नबाबगंज हे ठाणे तात्यांच्या स्वाधीन केले. त्या ठाण्यात भरपूर खजिना व दारूगोळा होता. तो तात्यांच्या आयताच हाती आला.

तात्यांनी आपल्या बुद्धिकौशल्याने इंग्रजांच्या स्वाधीन असलेले युद्धसाहित्य हस्तगत केले होते. त्यासाठी त्यांना युद्ध करावे लागले नाही. नाना व तात्या अडचणीच्या वेळी त्यांच्यावर बेहद्द खूश होता. त्यांची मदत घेऊनच त्याने काशीहून येणारे सैन्य लखनऊला पाठवले होते.

कानपूरचा खजिना लुटण्यात नाना यशस्वी झाले होते. अगदी हुशारीने इंग्रजांच्या डोळ्यात धूळ फेकून खजिना, दारूगोळा व इतर युद्धसाहित्य हस्तगत केले होते. हेच युद्धसाहित्य नाना व तात्या पुढे इंग्रजांविरुद्धच वापरणार होते.

४ जून १८५७ रोजी नानांनी तात्यांच्या मदतीने कानपूरचा खजिना व दारूगोळा लुटला होता. नानांची कानपूर परिसरात ताकद वाढली होती. कानपूर परिसरातील इंग्रज वसाहतीत तात्यांची दहशत निर्माण झाली होती. तात्यांनी कानपूर परिसरात जो दरारा निर्माण केला होता, या दराऱ्यामुळेच 'टॉड' या इंग्रज शिक्षकाच्या मध्यस्थीने इंग्रजांना नानांकडे तहाची याचना करावी लागली होती. तेथील असुरक्षित इंग्रज सैन्य नानासाहेबांच्या सुरक्षेखाली गंगेकडे पाठवण्याचे ठरले होते.

२७ जून १८५७ रोजी इंग्रजांनी आपले सर्व बस्तान हलवण्याचे ठरवले होते. नानांनी इंग्रजांना पाठवण्याची जबाबदारी तात्यांवर सोपवली होती. तात्यांनी गंगेच्या तीरावर हरदेव मंदिराच्या घाटावर एक नियंत्रक छप्पर उभे केले होते. नानांच्या आज्ञेवरूनच तात्या हे सर्व काम करत होते.

अचानक हरदेव मंदिरातून शंखनाद झाला आणि इंग्रजी सैनिकांवर गोळ्यांचा वर्षाव सुरू झाला. कुणाला काही कळण्याआधीच सर्व काही घडत होते. हिंदी सैनिकांनी तुफानी गोळीबार चालू केला होता. प्रत्युत्तर द्यायला इंग्रजी सैनिकांना वेळच मिळाला नाही. भांबावलेले इंग्रजी सैनिक सैरावैरा पळू लागले. त्यांचा पाठलाग करून त्यांना हिंदी सैनिकांनी ठेचले. गंगेच्या तीरावर हरदेव मंदिराजवळच ही घटना तात्यांच्या साक्षीने घडली होती. हे सर्व कटकारस्थान तात्यांनीच केले होते. तात्यांच्या आज्ञेवरूनच ही दुर्घटना घडली असा इंग्रजांचा आरोप होता.

गंगातीरी घडलेल्या घटनेला इंग्रजांनी तात्यांना जबाबदार धरले होते. तात्यांनी मनात आणले असते तर ही कत्तल ते रोखू शकले असते, असा इंग्रजांचा आरोप होता. इंग्रजांना काय वाटते याला

तात्या फारसे महत्त्व देत नव्हते. याचा दुष्परिणाम आपल्याला भविष्यात भोगावा लागणार याचीही तात्यांना चिंता नव्हती. कसलाही विचार न करता केवळ मातृभूमीच्या प्रेमापोटी तात्यांनी हे धाडस केले होते.

तात्यांनी आपले सैन्य वाढवण्यास सुरुवात केली होती. सैनिकांना आपलेसे करणे तात्यांना चांगले ठाऊक होते. त्यांच्यात मातृभूमीबद्दल प्रेम निर्माण करण्यात तात्या तरबेज होते. युद्धनीती गनिमी कावा यात तात्या हुशार होते. शत्रूचा पाठलाग करून त्यांना जेरीस आणण्यात तात्या खूप तरबेज होते. त्यांच्या युद्धकौशल्यावर नानासाहेब व झाशीची राणी लक्ष्मीबाई खूश होते.

नानासाहेबांची आज्ञा घेऊन तात्या शिवराजपूरला आले होते. तेथे बेचाळीस क्रमांकाच्या तुकडीने बंड केले होते. त्यांना आपलेसे करण्यात तात्या यशस्वी झाले. ती तुकडी तात्यांच्या सैनिकांत सामील झाली. त्यामुळे तात्यांना थोडे बळ आले होते.

त्याचवेळी कानपूरमध्ये ईस्ट इंडिया कंपनीचा हैवलौक याने धुमाकूळ घातला होता. त्याने पूर्ण कानपूर आपल्या वर्चस्वाखाली आणले होते. कानपूर जिंकल्याचा गर्व हैवलौकला होता. त्याची खोड मोडण्याचे तात्यांनी ठरवले होते.

हैवलौक गंगा नदी पार करून लखनऊला जाण्याच्या तयारीत होता. ही बातमी तात्याला लागली होती. हैवलौकला हैराण करायचे तात्यांनी ठरवले होते. हैवलौकचा उन्मादपणा तात्यांना जिरवायचा होता.

तात्यांनी एक योजना आखली. काल्पी शहरावर हल्ला करण्याचा बेत आखला. त्यानुसार तात्या काल्पीवर तुटून पडले. काल्पीचा किल्ला ताब्यात घेण्यासाठी तात्यांना झाशीच्या राणीचा पाठिंबा होता. झाशीच्या राणीनेही इंग्रजांना हैराण करून सोडले होते.

हैवलौकला कोंडीत पकडण्यासाठी तात्यांनी काल्पीचा किल्ला ताब्यात घेण्याच्या हालचाली चालू ठेवल्या. या कामी झाशीच्या राणीची मदत घेतली. तात्यांनी अचानक हल्ला करून इंग्रजांच्या ताब्यात असलेला काल्पीचा किल्ला ताब्यात घेतला. किल्ला ताब्यात असल्यामुळे ईस्ट इंडिया कंपनीला शह देण्याचे काम सोपे झाले होते.

तात्या आणि झाशीची राणी यांनी हैवलौकला हैराण करून सोडले होते. तात्या आणि झाशीची राणी यांच्यापुढे कंपनीने गुडघे टेकले होते. तात्यांना पायबंद घालणे कंपनीला कठीण जात होते.

तात्यांच्या शूरतेचे, योग्यतेचे, युद्धनीतीचे आणि डावपेचाचे इंग्रजांनीही कौतुक केले होते. 'मार्टिन' या इंग्रज अधिकाऱ्याने 'ब्रिटिश इंडिया' या आपल्या ग्रंथात तात्यांबाबत सुरेख वर्णन केले आहे. जेव्हा इंग्रज अधिकारी तात्यांचे आपल्या ग्रंथात कौतुक करतात त्यातूनच तात्यांची योग्यता स्पष्ट होते. मार्टिन म्हणतो,

''तात्यांनी इंग्रजांशी अखेरपर्यंत वाघासारखी झुंज दिली. या कुशल सेनापतीने ब्रिटिश सैनिकांना खूप हैराण केले, दमवले. नर्मदेच्या तीरावर तर तात्यांनी हैदोस घातला होता. कधी मागून पाठलाग करून तर कधी समोरून हल्ला करून ब्रिटिश सैनिकांचे मनोबल खचवले होते. डोंगरदऱ्या ओलांडताना, दलदलीच्या प्रदेशातून मुसंडी मारताना तात्या कधी कुठे असायचा याचा थांगपत्ताही लागत नव्हता.''

मार्टिनने तात्यांची थोरवी स्वत:च्या ग्रंथात मान्य केली आहे. नानासाहेब पेशव्यांची ठिकाणे कोठे आहेत याचा पत्ता इंग्रजांना लागत नव्हता. म्हणूनच ईस्ट इंडिया कंपनीने नानासाहेब पेशव्यांची ठिकाणे कोठे आहेत हे सांगणाऱ्याला एक लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. तात्यांना पकडण्यासाठी भरघोस बक्षीस जाहीर केले होते. तात्यांचा ठावठिकाणा सांगणाऱ्याला बक्षीस देऊ करून इंग्रज सरकारने तात्यांची किती धास्ती घेतली होती याची प्रचिती येते.

ब्रिटिश राजवटीला तात्यांना पकडण्यासाठी हताश होऊन बक्षीस जाहीर करण्याची नामुष्की आली होती. ग्वाल्हेरच्या राजाला तात्या जिवंत हवा असल्याचा बहाणा ब्रिटिश अधिकारी सर रिचर्ड मीड याने केला होता. त्यामुळे तात्यांना जिवंत पकडण्याची योजना त्याने आखली होती. काही केल्या तात्या जाळ्यात सापडत नव्हता. गुंगारा देण्यात तो पटाईत होता. अखेर फितुरीच्या मार्गाने तात्यांना पकडण्याचा बेत आखण्यात आला.

घरचा भेदी झाला की कुणाचे काही चालत नाही. सूर्याजी पिसाळमुळे मोगलांनी विनासायास रायगड ताब्यात घेतला होता. या फितुरीचा फटका छत्रपती राजाराम महाराज यांना बसून त्यांना रायगड सोडून जिंजीस जाणे भाग पडले. तेच तात्यांच्या बाबतीत घडले होते. मानसिंग नावाच्या मित्रानेच तात्यांचा ठावठिकाणा सांगितला होता. दगाबाजी करून सर रिचर्ड मीड यांना तात्यांना पकडण्यास यश आले होते.

अनेक दिवसांच्या भटकंतीमुळे तात्या थकले होते. गाढ निद्रेत असताना अचानक सर रिचर्ड मीड याने छापा टाकला आणि तात्यांना पकडले. ७ एप्रिल १८५९ साली तात्या इंग्रजांच्या जाळ्यात सापडले.

तात्या टोपे यांच्या शौर्याचे आणि अतुलनीय पराक्रमाचे वर्णन अनेक इंग्रज अधिकाऱ्यांनी केले आहे. इंग्रज अधिकारी मार्टिन प्रमाणेच सुप्रसिद्ध इंग्रज इतिहासकार मालेसन यानेही तात्यांवर स्तुतीसुमने उधळून तात्यांचे कौतुक केले आहे. तात्यांचा अतुलनीय पराक्रम, धाडस आणि अनाकलनीय रणनीती यामुळे मालेसन भारावून गेला होता. मालेसन म्हणतो,

''बंडखोरांचा हा पुढारी (तात्या) मूर्ख नव्हता.''

अपुऱ्या सैन्यानिशी कधी–कधी तात्या इंग्रजांवर तुटून पडायचे. प्रसंग अडचणीचा असला की अगदी सुरक्षितपणे रणांगणातून ते पळ काढायचे. पुन्हा नेटाने सैन्य उभारून इंग्रजांशी झुंज